सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण**
एअर मार्शल हेमंत चिटणीस मार्ग, कोर्ट नाका, खारकर आळी, पोलीस स्कुल समोर ठाणे पश्चिम-४००६०१,
E-MAIL ID – lcb.thane.r@mahapolice.gov.in दूरध्वनी क्र. ०२२-२५३४३५६७

---

**प्रेस नोट क्र. ०२**

## घरफोडी चोरी करणारे गुन्हेगारास स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीणचे पोलीसांकडुन अटक करुन दोन गुन्हे उघडकीस

दिनांक १७/०१/२०२४ रोजी ०५.०० वा चे सुमारास अज्ञात चोरटयाने यातील फिर्यादी ॲड.श्री. राजु तुकाराम खारीक वय ३९ वर्षे रा.एकविरा निवास, बोरपाडा, ता.भिवंडी जि.ठाणे याचे राहते घराचे मागील पडवीतुन आत प्रवेश करुन घरातील रोख रक्कम, विवो कंपनीचा मोबाईल तसेच बॅन्केचे ए.टी.एम, पासबुक व चेकबुक असा एकुण २८,६००/- रुपये किंमतीचा माल फिर्यादीचे संमतीशिवाय चोरुन नेले बाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी वरुन भिवंडी तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक ३२/२०२४ भादंविसंक ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला

ठाणे ग्रामीण जिल्हयातील मालमत्तेचे गुन्हे उघडकीस आणणे व त्यास प्रतिबंध करणेकामी मा. श्री. डॉ. डी. एस स्वामी, पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण तसेच श्रीमती दिपाली घाटे, अपर पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण यांनी स्थानिक गुन्हे शाखा ठाणे ग्रामीण यांना आदेश देवुन मार्गदर्शन केले त्याप्रमाणे श्री. सुरेश मनोरे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण यांनी ठाणे ग्रामीण जिल्हयातील मालमत्तेचे गुन्हे उघडकीस आणणे कामी वेग-वेगळे पोलीस पथके तयार करुन त्यांना मार्गदर्शन केले. सदर पथकाने गुप्त बातमीदारामार्फत तसेच तेथील सि.सी.टी.व्ही फुटेजचा तपास करुन कोणताही धागा दोरा नसताना अथक परीश्रम घेवुन आपले गुप्त बातमीदारांचे मार्फतीने सदरचा गुन्हा करणारा आरोपीताचा शोध लावुन इसम नामे संदीप सदानंद जाधव ऊर्फ पाटा वय ३० वर्षे रा.दुमाडा पाडा, कवाड, ता.भिवंडी जि.ठाणे यास ताब्यात घेवुन त्यांचेकडे कौशल्य पुर्ण तपास केला असता त्यांनी सदरचा गुन्हा तसेच पडघा पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक ३०/२०२४ भादंविसंक ४५७, ३८० हा गुन्हा केल्याची कबुली दिलेली आहे. त्यास पुढील कार्यवाही कामी भिवंडी तालुका पोलीस ठाण्याचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदरचा गुन्हा स्थानिक गुन्हे शाखा ठाणे ग्रामीणचे श्री.सुरेश मनोरे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, यांचे मार्गदर्शनाखाली सपोनिरीक्षक श्री.भास्कर जाधव, पो.उप.निरीक्षक श्री.महेश कदम, पो.हवा/प्रकाश साईल, संतोष सुर्वे, पो.शि/ स्वप्नील बोडके यांचे पथकाने उघडकीस आणलेला असुन गुन्हयाचा पुढील तपास भिवंडी तालुका पोलीस ठाणे करीत आहे.

*******************************************************************